CNR No.MHJN090007492022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २१ | १० | २०२२ |
| नोंदणी दिनांक | : | २१ | १० | २०२२ |
| निकाल दिनांक | : | २३ | ०४ | २०२४ |
| | | वर्षे | महिने | दिवस |
| | | ०१ | ०६ | ०२ |

**भाग ''अ''**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.२, बदनापूर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती.यु.पी.कोळी)**

**(घोषित केल्याचा दिनांक २३.०४.२०२४)**

**नि.फौ.खटला क्र.१५२/२०२२** **नि.क्र.२४**

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवाल क्र.४५८/२०२२ | दि.१८.०९.२०२२. |
| दोषारोप पत्र क्र.२०२/२०२२ | दि.१३.१०.२०२२. |
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन, बदनापूर, जि.जालना. |

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | :– | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, बदनापूर, जि.जालना. |
| **अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ** | :– | श्री.पी.एल.वरपे, सहा. सरकारी वकील. |
| | | **विरुध्द** |
| **आरोपीं** | :– | १. देविदास परसराम राठोड,<br>वयः ६१ वर्षे, धंदाः शेती,<br>२. शिवसिंग मन्नु राठोड,<br>वयः ६४ वर्षे, धंदाः शेती, |

| | | |
|---|---|---|
| | | ३. राजु शिवसिंग राठोड,<br>वयः ३६ वर्षे, धंदाः शेती,<br>सर्व रा.लक्ष्मणनगर तांडा, ता.बदनापूर,<br>जि.जालना. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | :– | श्री.बी.बी.वाघ. |

## भाग ''ब''

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १८.०९.२०२२ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | १८.०९.२०२२ |
| दोषारोप पत्राची तारीख | १३.१०.२०२२ |
| आरोपींवर दोषारोप ठेवल्याची तारीख | १२.०९.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २३.१०.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | २३.०४.२०२४ |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | २३.०४.२०२४ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | --- |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेला गुन्हा | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा ठोठावली | सी.आर.पी.सी. च्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | देविदास परसराम राठोड | फौ.प्र.सं. कलम ४१अ प्रमाणे | ---- | ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ भा.दं.वि. प्रमाणे. | निर्दोष | नाही. | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोटीस दिली. | | | | | |
| २. | शिवसिंग मन्नु राठोड | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे. | निर्दोष | नाही. | निरंक |
| ३. | राजु शिवसिंग राठोड | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे. | निर्दोष | नाही. | निरंक |

## भाग ''क''

## अभियोग पक्ष / बचाव / न्यायालयीन साक्षीदारांची यादी.

### अ. अभियोग पक्ष

| क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | सुदाम अर्जुन राठोड | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | मिठु सुदाम राठोड | साक्षीदार |
| अ.सा.क्र.३ | लक्ष्मी सुदाम राठोड | साक्षीदार |

### ब. बचाव साक्षीदारं

| क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ---- | ---- | ---- |

### क. न्यायालयीन साक्षीदारं

| क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ---- | ---- | ---- |

## अभियोग पक्ष / बचाव / न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी

### अ. अभियोग पक्ष

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२१ | फिर्यादी यांची फिर्यादवरील सही. |

**ब. बचाव**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ---- | ---- | ---- |

**क. न्यायालयीन निशाणी क्रमांक**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१७ | प्रकरणात तडजोड करण्यास परवानगी मिळणेबाबतचा अर्ज. |
| २. | नि.क्र.१८ | तडजोड पत्र. |
| ३. | नि.क्र.१९ | फिर्यादीची अन्य साक्षीदारं न तपासण्याबाबतची पुरसीस. |

**ड. भौतिक वस्तू / जप्त मुद्देमाल.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | मुद्देमाल पावतीप्रमाणे. | एक ओबड-धोबड आकाराचा दगड अंदाजे एक किलो वजनाचा असलेला. |

**<u>न्यायनिर्णय</u>**

(घोषित केल्याचा दिनांक २३ एप्रिल २०२४)

१. आरोपींवर भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः-</u>**

२. फिर्यादी सुदाम अर्जुन राठोड हे लक्ष्मणनगर तांडा, ता.बदनापूर, जि.जालना येथील रहिवासी असून शेती व ऊसतोडी काम करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांची शेती खडकवाडी शिवारात शेत गट क्र.३५ मध्ये आहे. त्यांच्या शेताशेजारी देविदास पांडुरंग राठोड यांच्या मालकीची शेती आहे. त्यांच्या दोन्ही शेतामध्ये बांध आहे. दि.१८.०९.२०२२ रोजी सकाळी ७.३० वाजेचे सुमारास फिर्यादी त्यांचे गावातील मारुती मंदिरावर दर्शनासाठी गेले. त्यावेळी, तेथे त्यांच्या शेता शेजारील देविदास परशुराम राठोड, त्याचे नातेवाईक शिवसिंग राठोड व राजु शिवसिंग राठोड असे तिघेजण मंदिरात बसलेले होते. तेव्हा फिर्यादी यांनी देविदास राठोड यांना ''तुम्ही माझ्या शेतात तुमचे बैल बांधल्याने झाडांचे नुकसान झाले आहे, बैल का बांधले'' अशी विचारणा केली असता त्यांना देविदास राठोड हा शिवीगाळ करुन ''तुमचे बाया सारखे दुसऱ्या ठिकाणी पाठवून आम्ही पैसे कमवत नाही'' असे म्हणाला. त्यावेळी, फिर्यादी त्याला समजावून सांगत असताना वरील सर्वांनी त्यांचेसोबत वाद करुन त्यांना चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. सदर भांडणाची माहिती फिर्यादी यांची पत्नी लक्ष्मी व मुलगा मिठ्ठु यांना समजल्याने ते भांडणाच्या ठिकाणी आले व भांडण सोडवित असताना शिवसिंग राठोड याने त्याच्या हातातील दगडाने फिर्यादी यांचा मुलगा मिठ्ठु याच्या डोक्यावर मारुन रक्तस्त्रावाची दुखापत केली व त्यांची पत्नी

लक्ष्मी हिला धक्काबुक्की करुन लोटलाट केली. वरील सर्वांनी त्यांना जिवे मारुन टाकण्याच्या धमक्या दिल्या. सदरील भांडण त्यांचे गावातील वसंत बाबु पवार व हिरालाल बद्दु राठोड यांनी सोडविले. भांडणामध्ये फिर्यादी यांच्या मुलाचे डोके फुटून रक्त निघाल्याने ते सदर लोकांविरुध्द तक्रार देण्यासाठी पोलीस ठाणे, बदनापूर येथे आले तेव्हा त्यांना उपचारकामी मेडीकल मेमो दिला व बदनापूर येथील सरकारी दवाखान्यात उपचारकामी पाठविले. उपचारानंतर फिर्यादी यांनी आरोपींविरुध्द घटनेबाबत पोलीस ठाणे, बदनापूर येथे रितसर फिर्याद दाखल केली.

३. या फिर्यादवरुन पोलीस स्टेशन, बदनापूर, जि.जालना येथे गु.र. क्र.४५८/२०२२ नोंदविण्यात येवून त्याचा पुढील तपास पो.उप.निरीक्षक नारायण जे. शेळके यांना देण्यात आला. तपासामध्ये त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे तपासटिपण नोंदविले. गुन्ह्यातील मुद्देमालाचा जप्ती पंचनामा केला. मुद्देमाल पावती तयार केली. आरोपींना फौ.प्र.सं. कलम ४१(अ) प्रमाणे नोटीस दिली. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. या न्यायालयाने आरोपींविरुध्द दोषारोप (नि.०८) ठेवला व त्यांना वाचून दाखविला. त्यावर आरोपींनी निवेदन (नि.क्र.९ ते ११) अन्वये गुन्हा कबूल नसल्याचे सांगून संपरिक्षा करण्याची विनंती केली.

५. अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यात आरोपींविरुध्द पुरावा मिळून न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नि.क्र.१ वरील आदेशान्वये नोंदविण्यात आले नाही.

६. या कामी उभय पक्षातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ऐकता व सादर करण्यात आलेला पुरावा पाहता माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकले काय की, दि.१८.०९.२०२२ रोजी सकाळी ७.३० वाजेचे सुमारास मारुती मंदिर, लक्ष्मणनगर तांडा, ता.बदनापूर, जि.जालना येथे आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुर्ततेसाठी संगनमताने त्यांचेपैकी आ.क्र.२ ने फिर्यादी यांचा मुलगा नामे मिठु याला दगडाने डोक्यावर मारहाण करुन रक्तस्त्रावाची दुखापत केली. त्याव्दारे, त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम **३२४** सह कलम **३४** अन्वयेचा गुन्हा केला आहे? | ...नकारार्थी. |

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकले काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुर्ततेसाठी संगनमताने फिर्यादी व त्यांची पत्नी नामे लक्ष्मी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन दुखापती केल्या. त्याव्दारे, त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम **३२३** सह कलम **३४** अन्वयेचा गुन्हा केला आहे? | ...नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकले काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुर्ततेसाठी संगनमताने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन अपमानित केले व सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले. त्याव्दारे, त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम **५०४** सह कलम **३४** अन्वयेचा गुन्हा केला आहे? | ...नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकले काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुर्ततेसाठी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारुन टाकण्याच्या धमक्या दिल्या. त्याव्दारे, त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम **५०६** सह कलम **३४** अन्वयेचा गुन्हा केला आहे? | ...नकारार्थी. |
| ५. | आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमीमांसा</u>

## <u>मुद्दे क्र.१ ते ४ करीता.</u>

७. याकामी अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे स्वरुप पाहता पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुद्दे क्र.१ ते ४ चे एकत्रित विश्लेषण करणे सोयीचे होणार असल्यामुळे सदर मुद्दे विश्लेषणाकरीता एकत्रित घेतलेले आहेत.

अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी यांची साक्ष नि.क्र.२० कडे नोंदवली आहे. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये कथन केले की, घटना ही अंदाजे दीड ते दोन वर्षांपूर्वी लक्ष्मणनगर तांडा येथील मारुती मंदिरासमोर सकाळचे सुमारास घडली होती. त्यांना घटनेची निश्चित तारीख व वेळ सांगता येणार नाही. घटनेदिवशी त्यांची आरोपीसोबत केवळ बोलचाल झाली होती. या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. त्यांनी घटनेबाबत फिर्याद (नि.क्र.२१) दाखल केली होती. सदर फिर्यादवर त्यांची सही आहे, परंतु त्यातील मजकुराची त्यांना माहिती नाही.

८. फिर्यादी/साक्षीदार अभियोग पक्षाला सहाय्य करीत नसल्याने सहा.सरकारी वकिलांनी त्यांना न्यायालयाचे परवानगीने सुचनात्मक प्रश्न विचारले. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासामध्ये, त्यांना

विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांना त्यांनी अमान्य केले आहे. फिर्यादी यांनी त्यांचे व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली असल्याचे व त्यांना प्रस्तुत प्रकरणात इतर साक्षीदारं तपासावयाचे नसल्याचे कथन केले आहे. आरोपींच्या विधीज्ञामार्फत घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासामध्ये त्यांनी आरोपींसोबत झालेले आपसात तडजोड पत्र त्यांनी प्रकरणात दाखल केले असून त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे. तसेच, त्यांचा आरोपींसोबत कोणताही वाद राहिलेला नसल्याचे सांगितले आहे.

९. मिठु सुदाम राठोड (अ.सा.क्र.२) याने त्याचे साक्षीमध्ये कथन केले की, घटना कधी घडली हे माहिती नाही. घटना काय घडली होती हे आठवत नाही. पोलिसांनी त्याचा घटनेबाबत जबाब घेतलेला नाही. साक्षीदार अभियोग पक्षाला सहाय्य करीत नसल्याने सहा.सरकारी वकिलांनी त्याला न्यायालयाचे परवानगीने सुचनात्मक प्रश्न विचारले. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या त्याच्या उलटतपासामध्ये, त्याला विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांना त्याने नाकारले आहे. सदर साक्षीदाराने त्यांचे आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसात झाले असल्याचे कथन केले आहे.

१०. लक्ष्मी सुदाम राठोड (अ.सा.क्र.३) हिने तिच्या साक्षीमध्ये कथन

केले की, घटना ही त्यांच्या गावातील मारुती मंदिरासमोर एक वर्षांपूर्वी घडली होती. घटना काय घडली हे तिला माहिती नाही. पोलिसांनी तिचा घटनेबाबत जबाब घेतलेला नाही. साक्षीदार अभियोग पक्षाला सहाय्य करीत नसल्याने सहा.सरकारी वकिलांनी तिला न्यायालयाचे परवानगीने सुचनात्मक प्रश्न विचारले. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या तिच्या उलटतपासामध्ये, तिला विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांना तिने अमान्य केले आहे. सदर साक्षीदाराने त्यांचे आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसात झाले असल्याचे कथन केले आहे.

११. प्राप्त पुराव्यावरुन, दि.१८.०९.२०२२ रोजी सकाळी ७.३० वाजेचे सुमारास मारुती मंदिर, लक्ष्मणनगर तांडा, ता.बदनापूर, जि.जालना येथे आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुर्ततेसाठी संगनमताने त्यांचेपैकी आरोपी क्र.२ शिवसिंग राठोड याने दगडाने फिर्यादी यांचा मुलगा नामे मिठु याचे डोक्यावर मारहाण करुन रक्तस्त्रावाची दुखापत केली. तसेच, सर्व आरोपींनी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्यांना, त्यांची पत्नी नामे लक्ष्मी व मुलगा मिठु यांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या इ. बाबी संशयाच्या पलीकडे जाऊन अभियोग पक्षामार्फत न्यायालयात सिध्द झालेल्या नाहीत. स्वतः फिर्यादी व साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीत दगडाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याच्या बाबी, शिवीगाळ केल्याच्या बाबी व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्याच्या बाबी

नाकारलेल्या आहेत. घटनेतील मुख्य साक्षीदार स्वतः फिर्यादी हेच घटनेबाबत काहीही सांगत नसल्यामुळे व त्यांचे तसेच आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाल्याबाबतचे तडजोड पत्र अभिलेखावर दाखल असल्याने फिर्यादी, साक्षीदार व आरोपींनी न्यायालयाबाहेर त्यांच्यातील भांडण आपसात मिटविलेले आहे ही बाबही समोर येते.

१२. सबब, अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्द भा.दं.वि., १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा शाबित करणारा कोणताही पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. वरील सर्व विवेचनास अनुसरुन आरोपींनी फिर्यादी यांचा मुलगा नामे मिठु याला दगडाने मारहाण करुन दुखापत केली होती. तसेच, फिर्यादी व त्यांची पत्नी नामे लक्ष्मी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन व शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या होत्या हे संशयाच्या पलीकडे जाऊन शाबीत न झाल्यामुळे हे न्यायालय मुद्दे क्र.१ ते ४ चे उत्तर ''नकारार्थी'' देत आहे.

## मुद्दा क्र.५ करीता.

१३. फिर्यादी व साक्षीदारं यांची आरोपींविरुध्द कुठलीही तक्रार नसून त्यांनी आरोपींसोबत तडजोड झाली असल्याबाबतचे तडजोड पत्र (नि.क्र.१८)

दाखल केले आहे. तसेच, प्रस्तुत प्रकरणात इतर कोणीही साक्षीदारं तपासावयाचे नसल्याबाबतची पुरसीस (नि.क्र.१९) दाखल केली आहे. सदर तडजोड पत्रावरुन फिर्यादी व आरोपीं हे एकाच गावातील रहिवासी आहे. गावातील प्रतिष्ठीत व्यक्तिंच्या मध्यस्थीने आपसात तडजोड झाली असल्याने फिर्यादी सदरील प्रकरण हे पुढे चालवू इच्छित नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन करता प्रस्तुत प्रकरणात उर्वरीत साक्षीदारं तपासणे उचित होणार नाही.

१४. आरोपींविरुध्द कुठलाही सबळ पुरावा आरोपींचा संबंध गुन्ह्याशी जोडण्याइतपत अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या फिर्यादी व साक्षीदारांचे साक्षीमध्ये आलेला नाही. याकामी सादर केलेल्या एकंदरीत पुराव्यावरुन आरोपी यांनी गुन्हा केला आहे हे अभियोग पक्ष निःसंशयरित्या सिध्द करु शकलेला नाही. त्यामुळे, आरोपीं निर्दोष मुक्त होण्यास पात्र राहील. सबब, मुद्दा क्र.५ च्या निष्कर्षादाखल हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ देविदास परसराम राठोड, क्र.२ शिवसिंग मन्नु राठोड व क्र.३ राजु शिवसिंग राठोड यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये पात्र असलेल्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी क्र.१ ते ३ यांचे जामीन बंधपत्र व वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपी क्र.१ ते ३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/– चे जामीन बंधपत्र व वैयक्तिक बंधपत्र सादर करावेत.

४. जप्त मुद्देमाल, एक ओबड–धोबड आकाराचा दगड अंदाजे एक किलो वजनाचा असलेला हा मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर त्याची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2024.05.02 14:59:52 +0530

दि.२३.०४.२०२४ (श्रीमती.यु.पी.कोळी),
बदनापूर न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.२, बदनापूर.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा बरोबर आहे.

लघुलेखकाचे नावः– वि.अ.ढोणे (लघुलेखक नि.श्रे.)
न्यायालयाचे नावः– न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.२, बदनापूर.
अपलोड केल्याची तारीखः– ०२.०५.२०२४.

स्वाक्षरीत/–
लघुलेखकाची स्वाक्षरी